International Year
of Cooperatives
Cooperatives Build a Better World

**महाराष्ट्र शासन**
**सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे**
**कार्यालय नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**
दुरध्वनी क्रमांक- २६१२२८४६/२६१२२८४७ ई-: मेल- vaidhanik8 @gmail.com

जा.क्र.४-सआ/कायदा व वै.का./जनविश्वास कायदा/हरकती/२०२६/३२९ दि.:- २९/०१/२०२६

## -: सूचना :-

**विषय :- महाराष्ट्र जनविश्वास कायदयाच्या अंमलबजावणीबाबत..**

शासनाकडील दि.१४/१/२०२६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, महाराष्ट्र जनविश्वास कायदयाच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या अधिनियमातील किरकोळ अपराधांच्या बाबतीत शिक्षेच्या तरतुदी रदद/ तर्कसंगत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. विधी सेंटर फॉर लिगल पॉलिसी यांनी कायदा सुधारणांचा मसुदा तयार केला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सुधारणा प्रस्तावित केलेल्या या अधिनियम सोबत जोडलेले प्रारुप, त्यामुळे बाधित होणा-या संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, जन सामान्यांच्या सूचना/ हरकती मागविण्यासाठी सहकार विभागाच्या https://mahasahakar.maharashtra.gov.in आणि https://sahakarayukta.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करीत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त प्रारुप, दि.६ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

उक्त प्रारुपाच्या बाबतीत, उपरोक्त दिनांकापूर्वी अनुषंगाने कोणत्याही व्यक्तीकडून सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१ यांचे कार्यालयास दि.६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पोस्टाने किंवा vaidhanik8@gmail.com या ई मेल पत्त्यावर प्राप्त झालेले कोणतेही आक्षेप किंवा सूचना विचारात घेण्यात येतील.

सोबत :- प्रारुप

( दिपक तावरे भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

आपणास कळविण्यात येते की, वरील सूचना व प्रारुपास हरकती व सूचना मागविण्यासाठी व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने आपल्या विभाग/ जिल्हयातील सहकारी संस्थांचे फेडरेशन, सहकारी संस्था, आपल्या अधिनस्त कार्यालये यांचे निदर्शनास आणून देण्याची व्यवस्था करावी. तसेच उक्त सूचनेची प्रत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्याच्या सूचना देण्यात याव्यात.